| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२- २९४५१००१<br>**Email ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


प्रेसनोट क्रमांक ३४९ दिनांक १६-१२-२०२१

## Paytm Spoofing करुन व्यवहार झाल्याचे भासवून फसवणुक करणाऱ्या गुन्हेगारास अटक - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयील सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार श्री. संदीप हणमंतराव शिंदे, व्यवसाय- युनिव्हर्सल हेल्थ केअर ॲन्ड सप्लायर्स (औषध वितरक) यांनी तक्रारअर्जामध्ये माहिती दिली की, दि.२७/१०/२०२१ रोजी मोबाईल क्रमांक ७९७७४७२४२० चा धारक याने हेडॉन इंजेक्शन या औषधाची मागणी नोंदविली व ऑनलाईन पेमेंट करणार असल्याचे सांगून त्याचे व्हॉटसअप वरुन पेटीएम पेमेंट केल्याबाबतचे दोन स्क्रिनशॉट व्हॉटसॲपवर तक्रारदार यांना पाठवून मोबाईल वरती ऑनलाईन पेमेंट केल्याचे भासवुन एकुण रुपये १७,३७०/- ची फसवणूक केली आहे.

सदर अर्जाचे अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक शेनोळकर यांनी सदर व्यवहाराबाबत पेटीएम पेमेंट बँक यांचेबरोबर संपर्क साधला असता सदरचे व्यवहार हे प्रत्यक्षात न होता बनावट/फसवे Paytm Spoofing असल्याचे निष्पन्न झाले. सदर अर्जाचे अनुषंगाने मोबाईल नंबरबाबत तपास करुन संशयित आरोपीत नामे नितेश ओमप्रकाश सिंग, वय २४ वर्षे पत्ता - रुम नं. बी २०४, शांती अकॉर्ड, गोकुल व्हिलेज, परुळेकर जिम जवळ, मिरा रोड पुर्व, ठाणे (भाड्याचे घर) यास ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने **Paytm Spoofing** करुन व्यवहार पेमेंट केल्याचे भासवून तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक केलेबाबत माहिती दिली. सदर तक्रारी अर्जावरुन वरील नमुद संशयित आरोपी विरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजि.क्र. ६८४/२०२१ भादंविस कलम ४०६, ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (क), (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपीतास अटक करण्यात आलेली आहे.

सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, मोबाईल क्रमांक ७९७७४ ७२४२० चा धारकाकडून अश्या प्रकारे Paytm Spoofing करुन किंवा अन्य बनावट पेमेंट ॲपव्दारे ऑनलाईन व्यवहार करुन आर्थिक फसवणुक झालेली असल्यास नया नगर पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्ष येथील पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोअं/२०७२ गणेश इलग, पोअं/३५७९ सुशिल पवार, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/ पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.